# हुतात्मा दिनी शहिदांना श्रद्धांजली

रत्नागिरी (वार्ताहर)

देशाच्या सीमा व अंतर्गत भागामध्ये नागरिकांचे रक्षण करताना शहीद झालेल्या सैनिक, पोलीस यांना जिल्हा पोलीस दलातर्फे आदरांजली वाहण्यात आली. सोमवारी पोलीस कवायत मैदान येथे हा कार्यक्रम पार पडला.

लडाखमधील हॉट स्प्रिंग या ठिकाणी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १० शूर शिपायांवर २१ ऑक्टोबर १९५९ रोजी चीनच्या सशस्त्र सैनिकांनी हल्ला केला होता. देशाच्या सीमेचे रक्षण करताना पोलिसांना प्राण गमवावे लागले होते. या स्मृती प्रित्यर्थ २१ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी 'पोलीस स्मृतीदिन' म्हणून साजरा केला जातो. देशात १ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत ५७१ पोलीस अधिकारी आणि जवानांना कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झाली आहे. या सर्व हुतात्म्यांना अनन्य दिनी आदरांजली वाहण्यात आली.

जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर हुतात्मा स्तंभ उभारण्यात आला होता. पोलिसांनी सलामी देऊन हुतात्मा



हुतात्मा दिनानिमित्ताने शहीद झालेल्या जवान व पोलिसांना हुतात्मा स्तंभावर पुष्पचक्र अर्पण करताना जिल्हाधिकारी

झालेल्या जवानांच्या नावाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर शहिदांना पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलीस अधीक्षक प्रवीण मुंडे, पोलीस उप अधीक्षक आयुब खान, पोलीस निरीक्षक शिरीष सासने, पोलीस निरीक्षक सुरेश कदम, हेमंतकुमार शहा, पोलीस निरीक्षक अनिल लाड, राखीव पोलीस निरीक्षक रामदास पालशेतकर यांच्यासह जिल्ह्यातील पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# हुतात्मा दिनी शहिदांना श्रद्धांजली

रत्नागिरी
प्रतिनिधी

कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या पोलिसांचे स्मरण व्हावे, यासाठी संपूर्ण भारतात २१ ऑक्टोबर हा दिवस हुतात्मा दिवस पाळण्यात येतो. सोमवारी पोलीस मुख्यालय येथे कर्तव्य बजावताना शहीद झालेल्यांना जिल्हा पोलिसांच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलीस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंडे उपस्थित होते.

भारतामध्ये १ जानेवारी २०१८ ते ३१ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत २९२ पोलीस अधिकारी व जवानांना हौतात्म्य आले. यामध्ये महाराष्ट्रातील २० जणांचा समावेश होता. श्रद्धांजली कार्यक्रमाला पोलीस उपअधीक्षक आयुब खान, पोलीस निरीक्षक शिरीष सासने, सुरेश कदम, हेमंतकुमार शहा, अनिल लाड,



रत्नागिरी : पोलीस परेड मैदान येथे हुतात्मा दिनी श्रद्धांजली वाहताना जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलीस अधीक्षक डॉ.प्रवीण मुंडे.

रामदास पालशेतकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हुतात्मा पोलिस जवानांना श्रद्धांजली

रत्नागिरी : प्रतिनिधी

कर्तव्य बजावत असताना प्राणार्पण केलेल्या पोलिस दलातील जवानांना २१ रोजी येथील पोलिस मुख्यालय परेड मैदानावर श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

श्रद्धांजली अर्पण करून हा दिवस भारतात पोलिस स्मृतिदिन म्हणून पाळण्यात येतो. लडाखमधील हॉट स्प्रिंग या ठिकाणी केंद्रीय राखीव पोलिस दलातील १० शूर शिपायांवर २१ ऑक्टोबर १९५९ रोजी चीनच्या सशस्त्र सैनिकांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात पोलिसांनी प्राणांची पराकाष्ठा करून प्रतिकार करण्याचा प्रयत्न करीत मातृभूमीचे रक्षण करताना समर्पण केले होते. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस देशभर पोलिस स्मृतिदिन म्हणून पाळला जातो. दि. १ सप्टेंबर २०१८ ते ३१ ऑगस्ट २०१९ या कालावधीत



रत्नागिरी : हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करताना जिल्हाधिकारी सुनील चव्हाण.

देशात एकूण २९२ पोलिस अधिकारी व जवानांनी कर्तव्य बजावत असताना हौतात्म्य पत्करले व शहीद झाले होते. त्यात महाराष्ट्र पोलिस दलातील २० पोलिस अधिकारी व जवानांनी कर्तव्य बजावत असताना प्राणार्पण केले होते. या सर्व हुतात्म्यांना २१ ऑक्टोबर २०१९ रोजी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमावेळी जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, पोलिस अधीक्षक डॉ. प्रवीण मुंढे, पोलिस उपअधीक्षक (गृह) अब्दुल खान, पोलिस निरीक्षक शिरीष सासने, सुरेंद्र फडतरे, हेमंतकुमार शहा, अनिल लाड, राखीव पोलिस निरीक्षक रामदास पालशेतकर यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.